
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 7 | APRIL - 2025

# अरुण काळे यांच्या कवितेतील जागतिकीकरण

प्रा. डॉ. मंगल कचरू सांगळे
के. व्ही. एन. नाईक कॉलेज सिन्नर, नशिक.

## प्रस्तावना :




साधारणतः १९९०च्या दशकात खाउजा धोरण सर्वत्र पसरू लागले. वैश्विक पातळीवर होणाऱ्या घडामोडींचा सर्वदूर परिणाम होऊ लागला. जग ही एक मोठी बाजारपेठ म्हणून उदयास आली. आपल्या देशातही खुल्या अर्थव्यवस्थेचे धोरण स्वीकारल्यामुळे परदेशी कंपन्या मोकळेपणाने वावरू लागल्या. जगात कुठेही मुक्तसंचार करण्यास परवानगी मिळाली आणि जग एकमेकांच्या जवळ येऊन ठेपले. जागतिकीकरणामुळे जवळपास सर्वच क्षेत्रांत एक वेगळी क्रांती घडून आली आणि अनेक गोष्टींच्या रुपात झपाट्याने बदल घडून आला. आर्थिक , सामाजिक , राजकीय, तांत्रिक, सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रांत अविश्वसनीय बदल घडून आले व त्याचे समजात इष्ट -अनिष्ट परिणाम दिसू लागले. भारतासारख्या विकसनशील देशाने खाउजा धोरण स्वीकारल्यामुळे आधीच गरीब- श्रीमंत दरी आणखी वधू लागली. मुठभर लोकांच्या हाती स्वतःला विकसित करण्याची , पैसा कमविण्याची साधने उपलब्ध होऊ शकली. गरीब जनता या साऱ्या डोळे दिपविणाऱ्या आधुनिक झगमगाटापासून दूर राहिली. नव्याने दाखल झालेल्या नाविन्यपूर्ण वस्तूंपासून ती कोसो दूरच राहिली. मुख्य प्रवाहापासून दूर राहिल्यामुळे समाजातील हा वंचित, बहुजनांचा गट मध्येच गटांगळ्या खाऊ लागला. जागतिकीकरणाच्या प्रवाहात श्रीमंतांचा गट मिळेल ते स्वतःच्या झोळीत टाकून घेऊ लागला आणि आर्थिक विषमता आणखी वृद्धिंगत होत गेली.

जागतिकीकरणाचे समाजात अनिष्टासोबतच इष्ट पडसाद जरी उमटले असले तरी समाजातील कष्टकरी, गरीब वर्ग मात्र आपसूकच दूर सारला गेला. जागतिकीकरणाच्या आगमनाने समाजातील राहणीमानाचा स्तर बदलला गेला. माणसाच्या जीवनशैलीत कमालीचे बदल दिसू लागले. जो तो जगण्याच्या स्पर्धेत उतरून जीवाच्या आकांताने स्वतःचे अस्तित्व टिकविण्याचा अघोरी प्रयत्न करू लागला.

## • जागतिकीकरणाची संकल्पना

इ.स. १९९०मध्ये जागतिकीकरण या नाविन्यपूर्ण संकल्पनेची ओळख जगाला झाली. भारत देशही याला अपवाद ठरू शकला नाही. जागतिकीकरण, खासगीकरण, उदारीकरण या आधुनिक संकल्पना हातात हात घालूनच वावरू लागल्या. त्याचे पडसाद सर्वच क्षेत्रांवर दिसू लागले. जागतिकीकरण आले आणि त्याचा सामाजिक घटकांवर खूप मोठ्या प्रमाणात परिणाम झाला. समाजातील अनेक घटकांत कमालीचा बदल जागतिकीकरणामुळे दिसू लागला. समाजातील विषमता कमी होण्याऐवजी ती वृद्धिंगत होण्याचा प्रकार साधारत: जागतिकीकरणानंतर विशेष करून दिसू लागला. गावगाड्याचे स्वयंपूर्ण रूप जागतिकीकरणाचे वारे वाहू लागल्यानंतर हळूहळू मोडकळीस येऊन ते नामशेष होण्याकडे वाटचाल करू लागले. गावांतील चैतन्य,मनातील हिरवेगारपणा हळूहळू

पाचोळयागत होऊ लागला आणि जगण्यातील एक सचेतन लय आपसूकच हरवू लागली. समाजातील सर्वसामान्य माणूस नव्याने आलेल्या ह्या प्रवाहात गटांगळया खाऊ लागला. मातीशी घट्ट नाळ जोडून असणारा माणूस हवेत झेपावणाऱ्या विमानाचा धसका घेऊ लागला. तर समाजातील एक भाग म्हणजे सधन गट विमानात बसण्याचे स्वप्न बघत जीवाची ओढाताण करेपर्यंत कुठेही निभाव न लागणाऱ्या स्पर्धेत धावपळ करू लागला.याबाबतीत पुढील मत परिस्थितीचे समर्पक वर्णन करणारे आहे."जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेत आज माणूस अधिकाधिक एकाकी, आत्मकेंद्री, विवक्षित होतो आहे, झालेला आहे. घरापासून तर बाहेरच्या समष्टीपर्यंत आपण आपला संवादच हरवून बसलो आहोत. संवाद हरवून बसल्यामुळे विचारांचे, भावनांचे आदान-प्रदानही खंडित झालेले आहे. नवरा-बायको, बाप-मुलगा, मुलगा-बाप, आई-मुले, भाऊ-भाऊ, भाऊ-बहिण, नात्यांतीलही संवाद तुटक होत आहे तसेच होतही नाही.कृतक आणि तात्कालिक होताना दिसून येतात. आज आपले संवादाचे माध्यम दूरध्वनी, भ्रमणध्वनी, एसएमएस, मेलवरील चॅटिंग, फेसबुक इतपतच सीमित राहिले आहे. नात्यातला, मानवी संबंधातला जिवंतपणा संपल्याची तीव्र जाणीव या काळात होऊ लागली आहे." १

जागतिकीकरणाच्या चक्रव्युहात संपूर्ण विश्व गुरफटून गेलेले आहे. माणसातील माणूसपण हळूहळू कमी होत आहे असे म्हणावयास हरकत नाही. भौतिक सुखसोयींच्या मागे धावताना तो स्वतःतील संवेदना, हळवेपणा, आपुलकी, जिव्हाळा सर्वच विसरत चालला आहे. बदलत्या जगासोबत स्पर्धा लावलेला माणूस आज पुरता आत्मकेंद्री आणि अप्पलपोटेपणा उराशी बाळगून आहे. शेजारच्या घरात काय सुरु आहे यापेक्षाही आपल्या स्वतःच्या घरात असणाऱ्या माणसांच्या सुख दुःखाशी देणे -घेणे नसल्याप्रमाणे आज तो मनाने दुरावला आहे. संवाद ही कोणत्याही नात्याची किल्ली असते आणि तीच किल्ली आज तो हरवून बसला आहे. नाते-संबंधातील सख्यत्व आणि मायेचा ओलावा याचा त्याला आपसूकच विसर पडत चालला आहे. जवळच्या माणसांबद्दलच त्याची आज कमालीची उदासीनता दिसून येते. भौतिक सुविधा व त्यामागे धावून त्याने आज स्वतःचे खेळणे करून घेतले आहे. नात्यांची खोली विसरून आज तो पैसा , प्रसिद्धी ह्या नश्वर गोष्टींच्या मागे वेडापिसा होऊन धावत आहे. भौगोलिक अंतराने जवळ आलेला माणूस आज खऱ्या अर्थाने मनाने एकमेकांपासून दुरावला आहे. म्हणून तर घरात बसून इंटरनेटच्या माध्यमातून तो परदेशातील व्यक्तींसोबत संवाद साधू शकतो पण शेजारी बसलेल्या माणसाच्या दुःखावर जराशी फुंकर घालण्याचे तो आज विसरून गेला आहे. एकमेकांच्या मनातील ही घालमेल मनातच राहू लागल्याने अंर्तगत दुःखाने प्रत्येक माणूस सुखी असल्याचा मुखवटा धारण करीत असला तरी तो दिखाऊपणा कुचकामी ठरत आहे. म्हणून तर माणसाला आज मायेची ऊब हवी आहे , प्रेम -जिव्हाळा हवा आहे पण त्याला आज तो तंत्रज्ञानाच्या मदतीने तो विकत घेता येत नाहीये. जवळ पद,पैसा, प्रसिद्धी असूनही प्रेमाला पारखा झालेला माणूस आज पुरता हवालदिल झालाय. म्हणून तो दिवसेंदिवस निराशेच्या गर्तेत अडकत आहे. हृदयविकार, मधुमेह, रक्तदाब, निद्रानाश यांसारखे आजार आज तो पदरात घेऊन सुखी असल्याचा आव आणत असल्यामुळे त्याची होणारी फरफट अस्वस्थ करणारी आहे. पैसा व इतर भौतिक सुविधा पायाशी लोटांगण घालीत असूनही आज तो अनामिक सुखाच्या शोधात आहे. पण या जागतिकीकरणाच्या  युगात तो हव्या त्या सुखाला मुकत आहे.पाश्चिमात्य संस्कृतीचे अनुकरण करणारी एक नवी पिढी जागतिकीकरणाने निर्माण केल्याने देशी संस्कृती नामशेष होत आहे. पूर्वीच्या काळी असलेले घरातील वातावरण जाऊन नवीन आधुनिक जीवनशैलीने नटलेले एक नवीन वातावरण दिसून येते. त्याचाच परिपाक म्हणजे मुलाला बापाविषयी कोणताही आदर , धाक राहिलेला नाही की बापाला मुलासोबत वेळ व्यतीत करण्याची इच्छा उरलेली नाही. कोणत्याच नात्यात पूर्वीसारखा गोडवा,जिव्हाळा उरलेला नाही.एकमेकांबद्दल ईर्षा, द्वेष, मत्सर मनात ठेवून स्वार्थाने बरबटलेला यांत्रिक माणूस सर्वत्र वावरताना दिसत आहे. त्यातून त्याच्या पदरी पडला आहे तो कमालीचा रुक्षपणा आणि एकटेपणा ! ही सारी देण नव्या आधुनिक तंत्रज्ञानाची आहे.

आपली संस्कृती जवळपास हद्दपार होण्याच्या मार्गावर आहे. पाश्चिमात्य संस्कृधोका ती इथल्या माणसाला भुरळ घालून एक नवीन गारुड करू पाहत आहे. याबाबतीत भालचंद्र नेमाडे यांचे मत पटण्यासारखे आहे – "जागतिकीकरणाला थोपवून धरणारं देशी परंपरांसारखं दुसरं कोणतंही अमोघ शस्त्र नाही. तुमची परंपरा डोळसपणे चालू ठेवली ना, की तुम्हाला नाहीसं होण्याचा धोका नाही. तुम्ही जर जुन्या काळाप्रमाणे मुंडासं वापरत

असाल तर तुम्हाला नव्या हॅटचा धोका नाही. पण तुम्ही बोडके राहिला तर हॅटचा धोका आहे. कारण हॅट अशा रिकाम्या जागेवर बसू शकते."२

अत्यंत मार्मिक शब्दांत भालचंद्र नेमाडे पाश्चिमात्य संस्कृती बद्दल आपले मत मांडतात. आपण वेळीच जागे होऊन आपल्या संस्कृतीच्या रक्षणासाठी पुढे सरसावलो , पुढाकार घेतला तर आपल्या देशी संस्कृतीचे, परंपरेचे मूळ रूप शाबूत ठेवू शकतो. ते सर्वस्वी आपल्या हातात आहे. आपणच जर नव्याचा मोह धरून मूळ संस्कृतीला बाजूला सारू लागलो तर तिची जागा नवी पाश्चिमात्य संस्कृती घेईल यात कसलीही शंका नाही. एव्हाना हा बदल हळूहळू का होईना होत आलेला आहे. नव्याच्या मोहापायी सर्वांगाने परिपूर्ण असलेली आपली संस्कृती , परंपरा कुठेतरी आपल्या हक्काच्या जागेवरून हद्दपार होत आहे. याबाबतीत देशी परंपरेचे दुःखं, वेदना शब्दात मांडता न येणाऱ्या आहे. आपल्या संस्कृतीचे, परंपरेला आपल्याच देशात पोरकं करण्यापेक्षा बाहेरून येऊ पाहणाऱ्या नव्या सांस्कृतिक लाटेला आपल्याला कसे थोपवता येईल याचा विचार करणे क्रमप्राप्त आहे.करार पद्धतीवर विवाह करणे असेल किंवा विवाह न करताही लिव्ह- इनमध्ये राहणे यांसारख्या परकीय संस्कृती माणसाला एका वेगळ्या पातळीवर नेऊन आणखी भावनाशून्य करू पाहत आहे. त्याच्यातील उरलेल्या संवेदनशीलतेला सुरुंग लावण्याचे काम इथे केले जात आहे.हे जर असेच सुरु राहिले तर येत्या काही दिवसांत विवाह ही संकल्पना कालबाह्य होऊन दुराचार बोकाळलेला दिसेल यात तिळमात्र शंका नाही. प्रत्येक बाबतीत करार होऊ लागला तर समाजातील शिष्टाचार, नैतिक मुल्ये यांसारख्या कित्येक महत्वपूर्ण गोष्टींना कायमस्वरूपी तिलांजली दिली जाईल आणि व्यभिचार सर्वत्र गवताप्रमाणे दिसू लागेल आणि समाजात एक वेगळ्या प्रकारचे अस्थैर्य निर्माण होऊन समस्त मानव जात धोक्यात येईल. आणि सर्वसामान्य वर्गाची आधीचीच फरफट आणखी वेगाने होईल.

बदलत्या काळानुसार लोकांनी नवी फॅशन, नवी संस्कृती याच्या वरवंट्याखाली समाज व समजातील प्रत्येक घटक आज ठेचून, भरडून निघाला आहे. अमेरिकन कपडे, चायनीज पदार्थ, फ्रेंच व्हिस्की, इंग्लिश पॉप संगीत यांसारख्या कित्येक नव्या रुपाला भाळून देशी संस्कृतीला सोडचिठ्ठी देणारा समाज जागतिकीकरणाच्या रगाड्यात पूर्णतः गुरफटला गेलाय. त्याला हे देखील लक्षात आलेले नाही की ज्या संस्कृतीत माणसाला माणूस आणि अन्नाला देव मानले जाते तिच्या प्रवाहातून आपण नकळतपणे कधी व कसे बाहेर फेकले गेलो आहोत. इतकी ही प्रक्रिया अगदी सहजपणे घडत आलेली आहे.

दिखाव्याच्या स्पर्धेत गतिमान झालेल्या समाजातील अनेक छोटे-मोठे बदल हे जागतिकीकरणाचे अपत्य आहे. नव्या तंत्रज्ञानासोबत जग बदलले असले तरी भारतासारख्या विकसनशील देशात मध्यमवर्गीय गट व दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत असलेला कॉमनमॅन मात्र महागाई, बेरोजगारी यांसारख्या समस्यांच्या विळख्यात अडकून बसला आणि त्याच्या विकासाला कुठेतरी खीळ बसली. भारतात पूर्वापार चालत आलेले, स्वतःचे अस्तित्व टिकवून असलेले लघुउद्योग जागतिकीकरणाच्या लाटेत गटांगळ्या खात दिसेनासे झाले.

- **अरुण काळे यांच्या कवितेवरील जागतिकीकरणाचा प्रभाव**

नव्वदच्या दशकानंतर ज्या लिहित्या कवींची नावे घेतली जातात त्यात विशेषत्वाने घेतले जाणारे एक नाव म्हणजे अरुण काळे ! मराठी साहित्याला वरदान लाभलेल्या मंडळींपैकी असणारे अरुण काळे हे होय. अरुण काळे यांच्या कवितेचे वैशिष्ट्य म्हणजे अगदी सहजपणे समाजवास्तव मांडणारी त्यांची कविता सर्वसामान्य माणसाच्या मनात खोलवर आपली छाप टाकते.१९९०च्या जागतिकीकरणाने बदललेला समाज,नाविन्याची झालर पांघरून डौलात मिरवणारी संमिश्र संस्कृती ह्या साऱ्या बाबींचे समाजावर पडलेले प्रतिबिंब अरुण काळे यांच्या 'नंतर आलेले लोक' या काव्यसंग्रहातून ओघानेच आलेले आहे. १९७२ च्या दुष्काळात आणीबाणीच्या राजकारणाचे प्रतिबिंब तरुण वयातच कवीच्या मनावर उमटले गेले आणि त्यातूनच त्याच्यातील कवी उत्स्फूर्तपणे कवितेतून व्यक्त झाला. वैश्विक जाणिवांचे बोट धरत अरुण काळे यांची कविता अनेक वळणे घेत आलेली दिसते.

'नंतर आलेले लोक' हा कविता संग्रह समाजातील वास्तव चित्रण मांडताना दिसतो. माणसाचे गाणे गात ही कविता समाजातील विषमता, नैतिकतेचे अधपतन झालेली वृत्ती, माणूसघाणी प्रवृत्ती पुढ्यात ठेवते. ग्लोबल युगात

गावगाड्याचे झालेले पोस्टमार्टम सदर कविता संग्रहातून आल्याचे दिसून येते. माणसापासून माणसाची तुटत जाणारी आंतरिक नाळ अशी एकाएकी तुटत गेल्याने कवीच्या मनातील खिन्नता देखील जाणविल्याशिवाय राहत नाही. समाजातील श्रीमंतानी गरीब, सर्वसामान्य जनतेची सुरु केलेली गळचेपी कवितेतून पदोपदी जाणवत राहते.अधिकारभेदाची जाणीव जन्माला घालणाऱ्या नानाविध व्यवस्थांचे स्तर अरुण काळे यांच्या कवितेतून प्रकर्षाने दिसून येतात. पिढ्यानपिढ्या सुरु असलेली दडपशाही, बहुजनांचा छळ, गुलामगिरीची वागणूक व त्यातूनच विकासाच्या मुख्य प्रवाहापासून कोसो दूर राहिलेला बहुजनांचा लोंढा याबद्दल कवीचा संताप, चीड देखील दिसल्यावाचून राहत नाही. प्रेमाने राहणारा माणूस प्रचंड कावेबाज झाल्याचे कवी म्हणतो. अशावेळी कवी त्यांना सनकावून विचारतो की जागतिकीकरण फक्त वस्तूंचेच करण्याऐवजी प्रेमाचे झाले तर प्रेम आणि द्वेष असा पूर्वापार सुरु असलेला झगडा, वाद कायमचा थांबेल.तथागत गौतम बुद्ध आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवतावादी दिशादर्शी बोटाला पकडून ही कविता माणुसकीचा छोटासा का होईना झरा शोधण्याचा प्रयत्न करते. मानवमुक्तीचा, मानव उन्नतीचा मार्ग स्वीकारणारी ही कविता समतावादी विचारांना कवेत घेते.

नव्या जगाच्या आगमनानंतर जुन्या नैतिक मुल्यांची झालेली गळचेपी ते सांगायला विसरत नाही. निळया प्रकाशाची ज्योत घेऊन ही कविता बाबासाहेबांच्या स्वप्नातील समाज प्रत्यक्षात आणण्यासाठी आणखी काय करावे लागेल याबद्दल देखील अरुण काळे यांची कविता हितगुज करताना दिसून येते. पण दुर्दैवाने परिस्थिती निराळी असल्याचे देखील समजते. माणसाला माणसाची भीती वाटावी इतके भयावह वातावरण आसपास असल्याचे कवी म्हणतो. नंतर आलेल्या लोकांनी माणसातील जिवंत माणसाला व त्याच्यातील संवेदनशीलतेला कायमचे हद्दपार केल्याने जगाला सुंदर बनविणारा आणि आपल्या सुंदर नजरेने सुंदर जग बघणारा माणूसच आज हवालदील झाला आहे.

**कवी म्हणतो –** "त्यांनी खंड शोधले देश शोधले
ग्रह आणि तारे शोधले
आपल्या बापांची नावे दिली त्यांना
माणूस शोधला नाही
नंतर आलेल्या लोकांनी" ३

नव नवीन शोध लावत चंद्रावर पोचणाऱ्या लोकांनी अमाप शोध लावले. आपल्या ह्या धाडसाला कुरवाळत त्यांनी आपला टेंबा जगभर मिरावा म्हणून किंवा आपली कीर्ती इतिहासातील पानांत नोंदली जावी म्हणून त्यांनी शोधलेल्या ठिकाणांना आपल्या बापांची नावे दिली. ग्रह – तारे शोधून अकलेचे तारे तोडणाऱ्या लोकांनी कमालीचा प्रेमळ, संवेदनशील, हळवा, अख्ख्या जगावर प्रेमाची सावली धरू पाहणारा माणूस मात्र त्यांना शोधता आला नाही, हे कवी ठामपणे सांगतो. नंतर आलेल्या लोकांची ही शोधमोहीम आजही सुरु आहे आणि कदाचित यापुढे देखील ती सुरूच राहणार आहे पण अवघे विश्व ज्याच्यामुळे सुंदर झाले त्याला मात्र ते शोधू शकत नाहीये. कवीच्या स्थायीभाव हा चिंतनशीलतेचा असून तो क्षणोक्षणी दिसून आल्याखेरीज राहत नाही.पिढ्यानपिढ्या छळ झालेल्या समाजाची पार्श्वभूमी असलेल्या अरुण काळे यांनी समाजातील विषमता व जातीभेद यावर देखील ताशेरे ओढलेले दिसून येतात.

नव्वदच्या उंबरठ्यावर जग बदलू लागले आणि परदेशातील झगमगाटाचा एका विशिष्ट वर्गाला प्रचंड मोह निर्माण झाला. यात दुर्बल , वंचित घटकाला मात्र कुठेही स्थान नाही हे कवीला दिसू लागले.आपल्या मानतील खदखद कवीने नाविन्यपूर्ण व सर्जनशील अशा प्रतिमांतून हे बदलते चित्र तसेच दुर्बल घटकांवर होणारा अन्याय

अत्याचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे.नवेपणाच्या झगमगाटाला कवटाळणारा माणूस आज किती दगडाच्या काळजाचा,असंवेदनशील झाला आहे

जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर सुरु होणारी अरुण काळे यांची कविता वाचकाला ग्लोबल वातावरणाच्या विश्वाकडे घेऊन जाणारी आहे. या कवितेने युगप्रवर्तक जाणीवा व्यक्त केल्या आहेत. बदलत्या जीवनशैलीमुळे बदलत चाललेला माणूस व त्यातून तुटत चाललेली माणुसकीची नाळ कवीला अस्वस्थ करते. कवीच्या मनातील हीच घालमेल त्यांच्या कवितेतून आपसूकच समोर येताना दिसते.यांत्रिकीकरणाकडे खेचला जाणारा माणूस समाज बांधवांसोबत असलेले सख्यत्वाचे दोर स्वतःच्या हाताने कापून पुढे दिसणाऱ्या आभासी जगाकडे जात आहे. माणूस असल्याच्या सर्वच खाणा खुणा तो मिटवत पुढे जात आहे. याचेच दुःखं कवीने नकळतपणे आपल्या कवितेतून मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. अरुण काळे स्वतः एक कॉमन मॅन असल्यामुळे त्यांची कविता प्रातिनिधिक ठरते.

जातीयतेच्या वरवंट्याखाली पिढ्यानपिढ्या चिरडल्या गेलेल्या बहुजन समाजाचे दुःखं आजही हिरवेगार असल्याची खातरजमा सदर कवितेतून आपसूकच समजते. माणसाला माणूस म्हणून स्वीकारण्याची मानसिकता अजूनही नसल्याची खंत दिसून येते. माणसाला माणसापासून दूर घेऊन जाणारी ही समाजव्यवस्था आजही तितकीच निर्ढावलेली असल्याचे शल्य कवीला जाणवते. ह्याच दुःखाचे पदर एक एक कविता हळुवारपणे उलगडवत जाते. पूर्वापार चालत आलेला तोच तो पणा या कवितेत दिसून येत नाही. काळानुसार कवितेच्या कक्षा रुंदावत जाऊन त्यात समाजातील दुःखं, दैन्य, अगतिकता, असाह्यता, दुर्बलता सारे घटक त्यात अंतर्भूत होत जातात. काळ पुढे लोटत असला तरी आपण ज्या समाजात राहतो तिथे वंचित घटकाला विवंचनेच्या खाईत रोज नव्याने ढकलले जातेय. याच घटनांचा नोंदणीकृत पट म्हणजे अरुण काळे यांची कविता ! जागतिकीकरणाचे वारे सर्वदूर वाहत असताना ते अरुण काळे सारख्या संवेदनशील कवीच्या मनचक्षुवर स्थिरावले व त्यातूनच त्यांच्या मनातील कवितेला वाट मोकळी झाली. जागतिकीकरणाच्या येण्याने कॉमनमॅनच्या आयुष्यात काय स्थित्यंतर घडून आले, त्याच्या उन्नतीची दारे उघडली गेली की बंद झाली , माणूस म्हणून माणसाचे मूल्य वृद्धिंगत झाले की लयाला गेले अशा नानाविध प्रश्नांनी कवीच्या मनात फेर धरला आणि हळव्या काळजाचा हा कवी आपल्या कवितेतून त्यावर बोलू लागला आणि ही कविता म्हणजेच त्यांचा 'ग्लोबलचं गावकूस'होय.त्यांच्या कविता संग्रहाच्या शीर्षकातच जागतिकीकरणाचा प्रभाव दिसून येतो.अरुण काळे आपल्या 'संवेदनांना गाडत चाललेलं, हे शहर' या कवितेत म्हणतात-

"शेअर होल्डर्स अर्थात भागधारक
संवेदनशील झालेलं हे शहर
एक माणूस एक मत
एक माणूस एक दगड
सिमेंटच्या जंगलात
वळवळतात पॉलिस्टरची झाडं
यांना कुणीही देतं दारुबत्ती
लोकल्सच्या पारंब्यांना लोंबकळत
माणसं खेळतात सुरपारंब्या
लोकलचाही पाडतात मुडदा
हिल्सच्या जगाला लागत नाही
काडीचाही धक्का
शेअर्स सारखी वधारतात
अन् धडाधड कोसळतात माणसं

लंच बॉक्स, शिदोरीत जीव बांधून
निघतात माणसं" ४

जागतिकीकरण आले म्हणजे सर्वांचा विकास होईल हे एक असे स्वप्न ठरले जे अजूनही बहुजन, सर्वसामान्य माणसापासून कोसो दूर राहिले आहे. उन्नतीच्या नावाखाली माणूस आज स्वतःला अशा ठिकाणी घेऊन गेला आहे जिथे त्याने माणूस व माणुसकी असल्याच्या सर्व रेषा आपल्या हाताने पुसून टाकल्या आहेत. मुठभर लोकांनी जागतिकीकरणाच्या तव्यावर आपली पोळी भाजून घेण्याचे काम मोठ्या शिताफीने केले आहे. यात मागे राहिला तो दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असणारा सर्वसामान्य माणूस! सिमेंटच्या जंगलातील कृत्रिम झाडं सगळीकडे दिसत असल्यामुळे निसर्गाचा अस्सलपणा ह्या जागतिकीकरणाने हिरावून घेतला आहे. सदर दुःखं कवीच्या शाब्दिक लयीतून आपसूकच जाणवत राहते. जागतिकीकरणाच्या वाढत्या रेट्यात पैसा,संपत्ती याच्या मागे धावताना सर्व गोष्टींचा जणू त्याला विसर पडला आहे.म्हणूनच कवीला ही भाऊ गर्दी लोकल्सला लटकून सुरपारंब्या खेळताना दिसतेय. जागतिकिकरण आले म्हणजे महाविकास झाला या भ्रमात असणाऱ्यांसाठी कवीने दिलेली एक सूचकता येथे बघायला मिळते. माणसा-माणसांतील प्रेमाचे, जिव्हाळ्याचे नाते आपसूकच फिके पडत असल्याचे दिसते. जागतिकीकरण आले नि मुठभर लोकांचे खिसे गरम करू लागले आणि एका बाजूला पिढ्यानपिढ्या दोन वेळच्या जेवणासाठी वंचनेत असलेल्या बहुजनांचा लोंढा लोकल्सला सुरपारंब्या खेळू लागले. टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठी माणूस आज वाटेल ते करतोय अगदी माणुसकी खुंटीला टांगायला देखील तो मागे पुढे बघत नाही. त्यांची ही जीवघेणी कसरत सुरु असताना दुसऱ्या बाजूला आरामात एसी ची हवा खात बसलेला मुठभर कुबेरांचा गटाला मात्र त्याबद्दल थोडीही भनक नाही, याहून मोठी शोकांतिका नसावी. जागतिकीकरण आले आणि ठराविक लोकांना मांडीवर घेऊन बसले नि काहींना दारात उभे करून ठेवले ते चित्र आजही तसेच असल्याचे कवी निदर्शनास आणून देण्यास विसरत नाहीत. जागतिकीकरणाचा परिणाम झाला पण तो कुणावर किती व कसा झाला याचाच लेखाजोखा मांडण्याचा प्रयत्न अरुण काळे यांची कविता करते. सर्वसामान्यपणे आई लेकरांना समान माया करते हे जग जाहीर आहे. पण सध्याच्या घडीला साऱ्या जगाची आई होऊ पाहणाऱ्या जागतिकीकरणाने मात्र समाजातील काहींना सख्ख्या लेकरासारखे वागवले नि वागवत आहे तर उरलेल्या बहुसंख्य व गरजू लेकरांना सुरुवातीपासूनच हिडीसफिडीस केल्याचे चित्र दिसते. आणि हीच अगतिकता कवितेतून आपसूकच येताना जाणवते.

जागतिकीकरण पकडताना अरुण यांची कविता अतिशय समजदार झालेली दिसते. तिने प्रवाहासोबत आलेल्या या नव्या लाटेचा माणसाच्या अंतर्बाह्य जगावर होणारा परिणाम गांभीर्याने बघितला आहे.त्यामुळे माणसाचे मन आणि वस्तू यांचा कसा ताबा घेतला आहे ,याचे विवेचन करताना त्यांची लेखणी आपसूकच बोलकी होत जाते.जागतिकीकरणाने सर्वांना मुक्तपणाचे पंख दिले नसून अनेकांची होणारी घुसमट प्रकर्षाने जाणवते.जागतिकीकरणातील नव्या संज्ञा खुल्या जगाचे नाव घेऊन येतात; पण प्रत्यक्षात सर्वांना सर्वकाही खुले नसते नि हीच अगतिकता त्यांची कविता व्यक्त करते.ज्यांच्याकडे संगणक आहे, संगणकावरील कळ दाबून पळवायचा माऊस आहे त्यांच्यासाठीच नव्या जगाची दारे खुली होतात, ही शोकांतिका उरात घेऊन अरुण काळे यांची कविता सत्य समोर आणून वास्तवदर्शन करण्याचा प्रयत्न करताना दिसते.

## निष्कर्ष व मूल्यमापन

नव्वदच्या दशकात जागतिकीकरण आले आणि त्याचा समाज, साहित्य, राजकारण, संस्कृती या साऱ्याच क्षेत्रांवर कमालीचा दूरगामी परिणाम झाला. संपूर्ण मानवजातीला करुणेची शांततेची शिकवण देणारे तथागत गौतम बुद्ध आणि मानवकेंद्रित समाज अपेक्षित असणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक पाऊलखुणा जपत अनेक साहित्यिक लेखण्या घेऊन पुढे आले. आणि पिढ्यानपिढ्या पिचलेल्या, खचलेल्या समाजाला दारिद्र्याच्या खोल गर्तेतून बाहेर काढण्यासाठी झटू लागले.अंधाऱ्या वाटा तुडवत प्रकाशाचा कवडसा शोधत ते आपल्या समाज बांधवाना उजेडात आणण्यासाठी पुढे आले. त्यातलेच अरुण काळे हे एक महत्वाचे कवी म्हणता येतील.अरुण काळे

नव्वदोत्तर कालखंडातील मराठी कवितेला सर्वांगाने समृद्ध करणारा एक सशक्त कवी असे म्हणता येईल. 'नंतर आलेले लोक', 'ग्लोबलचं गावकूस', 'रॉकगार्डन', 'सायरनचे शहर' असे एकूण चार कविता संग्रह त्यांचे प्रसिद्ध आहेत.त्यांचा साहित्यिक उंचीचा आलेख आपल्याला त्यांच्या कवितांतून सहजपणे लक्षात आल्याशिवाय राहत नाही. अरुण काळे हा आंबेडकरी चळवळीतील एक कार्यकर्ता कवी आहे. आपल्या सामाज बांधवांसाठी उजेड शोधत असताना डॉ बाबासाहेबांच्या विचारांची पेरणी समाजात करायची असल्याने अरुण काळे यांनी लेखणी उचलली आणि त्याकाळातील आंबेडकरवादी कवितांच्या अनुषंगाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. अरुण काळे यांनी विश्वाचे एक व्यापक रूप आपल्या नजरेने बघून मग कविता लिहायला सुरुवात केल्यामुळे ते काळाच्याही पुढे आपल्या कवितेतून पाहू शकले , त्यावर वास्तवदर्शी भाष्य करू शकले. जगात घडून आलेले बदल , आपल्या आसपास घडून आलेले बदल याचे त्यांनी बारकाईने निरीक्षण केले आणि हीच सूक्ष्मता त्यांच्या कवितेतून आल्याचे जाणवते.

जागतिकीकरणात वावरणाऱ्या आणि विकासापासून कोसो दूर असणाऱ्या वंचित समाजाचा संघर्ष त्यांनी आपल्या कवितेतून टिपण्याचा प्रयत्न केला आहे. जागतिकीकरणाच्या अत्यंत जटील व गुंतागुंतीच्या प्रक्रियेकडे ते आंबेडकरवादी चक्षुतून बघत असल्याने आपल्या कवितेतून आर्थिक , सामाजिक विषमता पट ते ताकदीने दाखवू शकले आहेत.

'नंतर आलेले लोक' या कविता संग्रहाच्या माध्यमातून त्यांनी जागतिकीकरणाच्या परिणामांचा धांडोळा घेतला आहे.आपली कविता मराठी कवितेत कशी वेगळी आहे हे त्यांच्या या वेगळया व निराळया शैलीतून लगेच जाणवते.आंबेडकरवादी विचारांचे रसायन त्यांच्या कवितेत पूर्णपणे मुरलेले असल्याचे त्यांच्या कवितांतून लगेच लक्षात येते.म्हणून आंबेडकरवादी कविता प्रवाहातील ते एक महत्वाचे कवी म्हणून त्यांचा उल्लेख करता येतो.जागतिकीकरणामुळे सामाजात निर्माण झालेली विषमता हाच अरुण काळे यांच्या चिंतनाचा विषय असून यातूनच त्यांची कविता जन्माला आली आहे.अरुण काळे यांच्या कवितेत कुठेही कल्पनाविलास दिसून येत नाही.त्यांच्या कवितेतून सामाजिक दाहकता,वास्तवभान चित्रित झाले आहे.सर्वसामान्यांचे दुःखं आपले समजून त्यांची कविता जगत असलायचे लक्षात येते.

## संदर्भसूची

१. शोभणे रवींद्र (संपादक),जागतिकीकरण समाज आणि मराठी मराठी साहित्य, विजय प्रकाशन, नागपूर, प्र. आ. फेब्रुवारी २०१२, पृ. क्र. २४, २५ (प्रस्तावना)

२. तत्रैव, पृष्ठ क्र. १८, १९

३. काळे अरुण, नंतर आलेले लोक, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, प्र. आ. डिसेंबर २००६, पृष्ठ क्र. ६

४. काळे अरुण, ग्लोबलचं गावकूस, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई,
प्र.आ. २७ ऑगस्ट २००८, पृष्ठ क्र. १९